# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः29.08.2024** **वारःगुरुवार**

---

1. औद्योगिक परिदृश्याचा कायापालट करणाऱ्या बारा नव्या हरितक्षेत्र औद्योगिक स्मार्ट शहरांना केंद्र सरकारची मंजुरी
2. स्थानिक विषयांच्या प्रसारणाला प्रोत्साहन देणाऱ्या नव्या 730 एफएम वाहिन्यांच्या लिलावाला मंत्रिमंडळाची मंजुरी, महाराष्ट्रातल्या 11 शहरांचा समावेश
3. आर्थिक समावेशनात महत्त्वाच्या असलेल्या पीएम जनधन योजनेची दशकपूर्ती, देशभरात जनधनची 53 कोटी खाती
4. वायु दलाच्या ऐतिहासिक शौर्यगाथा असणाऱ्या कॉमिकचं वायु दल प्रमुखांच्या हस्ते काल अनावरण आणि
5. पॅराऑलिम्पिक क्रीडा स्पर्धाचं काल पॅरीस इथं भव्य उद्घाटन, 84 भारतीय दिव्यांग खेळाडूंचा सहभाग

**<u>कॉरीडॉर</u>**

केंद्रीय मंत्रिमंडळानं राष्ट्रीय औद्योगिक कॉरिडॉर विकास कार्यक्रमाअंतर्गत बारा नव्या हरितक्षेत्र म्हणजेच ग्रीनफिल्ड औद्योगिक स्मार्ट शहरांना मंजुरी दिली आहे. यामुळे देशाच्या औद्योगिक परिदृश्याचा कायापालट होणार असून या औद्योगिक क्षेत्रात एकत्रित अंदाजे गुंतवणूक 28 हजार 602 कोटी रुपये असेल. या प्रकल्पांमुळे दहा लाख प्रत्यक्ष आणि 30 लाख अप्रत्यक्ष रोजगार निर्माण होतील, अशी माहिती केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी नवी दिल्ली इथं मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर प्रसारमाध्यमांना दिली. हे बारा प्रकल्प दहा राज्यांमध्ये पसरले असून सहा प्रमुख कॉरिडॉरसह धोरणात्मकपणे नियोजित आहेत. महाराष्ट्रातील दिघी कॉरिडॉरसह उत्तराखंडमधील खुरपिया, बिहारमधील गया, पंजाबमधील राजपुरा-पटियाला, तेलंगणातील झहीराबाद, आंध्र प्रदेशातील ओरवाकल आणि कोपरती, केरळमधील पलक्कड, राजस्थानमधील जोधपूर-पाली आणि उत्तर प्रदेशातील आग्रा आणि प्रयागराज या ठिकाणी हे प्रकल्प प्रस्तावित आहेत.

**<u>रेल्वेमार्ग</u>**

सीसीईए अर्थात आर्थिक व्यवहार मंत्रिमंडळ समितीनं दोन नवे रेल्वेमार्ग आणि एका मल्टी ट्रॅकिंग प्रकल्पासाठी 6 हजार 456 कोटी रुपयांच्या निधीला मंजुरी दिली आहे. या प्रकल्पामुळे दळणवळण सुलभ होईल, तेल आयात कमी होईल, तसंच कार्बन डायऑक्साईडचं उत्सर्जन कमी होण्यास मदत होईल, असं रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी काल बैठकीनंतर सांगितलं. जमशेदपूर-पुरुलिया-आसनसोल या 121 किलोमीटर अंतरासाठी तिसरी मार्गिका आणि सरदेगा-भालुमुडा या 37 किलोमीटरच्या दुहेरी मार्गाला मंजुरी दिल्याची माहिती वैष्णव यांनी दिली. नवीन प्रकल्पांमुळे एक हजार 300 खेडी जोडली जाणार असल्याचंही त्यांनी सांगितलं.

**<u>कृषि सुविधा</u>**

केंद्रीय मंत्रिमंडळ बैठकीत कृषी क्षेत्रातल्या पायाभूत सेवांच्या केंद्रीय क्षेत्र विस्तारालाही मंजुरी देण्यात आली. कृषी क्षेत्रातल्या पायाभूत सेवांना बळकट करण्यासाठी एआयएफ अर्थात कृषी पायाभूत सुविधा निधीचा विस्तार करण्याचा निर्णय केंद्रीय मंत्रिमंडळानं घेतला आहे. कृषी प्रकल्पांची व्याप्ती वाढवणं आणि कृषी पायाभूत सेवा परिससंस्थेला मजबूत करणं हा याचा हेतू असल्याचं सरकारनं म्हटलं आहे.

**<u>वाहिन्या</u>**

देशातल्या 234 शहरांमध्ये 730 एफएम प्रसारण वाहिन्यांच्या लिलावाला केंद्रीय मंत्रिमंडळानं मंजुरी दिली आहे. मातृभाषेत स्थानिक विषयांशी संबंधित प्रसारणाला प्रोत्साहन देण्यासाठी हा निर्णय घेतल्याचं वैष्णव यांनी सांगितलं. या

निर्णयामुळे दुसऱ्या आणि तिसऱ्या श्रेणीच्या शहरांमध्ये एफ एम वाहिन्यांचं प्रसारण उपलब्ध होईल. यात महाराष्ट्रातल्या 11 शहरांचा समावेश आहे. आकांक्षित जिल्हे आणि नक्षल प्रभावित भागाला या प्रसारणासाठी प्राधान्य देण्यात आलं आहे.

**<u>जनधन</u>**

प्रधानमंत्री जनधन योजनेला काल 'एक दशक' पूर्ण झालं. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 28 ऑगस्ट 2014 रोजी ही योजना सुरु केली होती. या योजनेअंतर्गत देशभरात आतापर्यंत 53 कोटी जनधन खाती उघडण्यात आली आहेत. या योजनेच्या दशकपूर्तीनिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लाभार्थींचं अभिनंदन केलं असून ही योजना यशस्वी केल्याबद्दल त्यांचे आभार मानले आहेत. आर्थिक समावेशन आणि महिला-युवकांच्या सक्षमीकरणाच्या प्रयत्नांमध्ये जनधन योजनेचा महत्त्वाचा वाटा असल्याचं मोदी यांनी समाजमाध्यमावरील आपल्या पोस्टमध्ये म्हटलं आहे. दरम्यान, हा जगातला सर्वात मोठा 'वित्तीय समावेशन उपक्रम' असून अर्थ मंत्रालय, या माध्यमातून उपेक्षित आणि आर्थिकदृष्ट्या मागास घटकांना आधार देण्याचा प्रयत्न सातत्यानं करत असल्याचं केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी म्हटलं आहे.

**<u>बैठक</u>**

एनटीएफ अर्थात राष्ट्रीय कृती दलाची दुसरी बैठक काल नवी दिल्ली इथं झाली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी केंद्रीय गृहसचिव आणि केंद्रीय आरोग्यसचिव होते तर सर्व राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांचे मुख्य सचिव आणि पोलीस महासंचालक बैठकीत दूरदृष्यप्रणालीमार्फत सहभागी झाले होते. वैद्यकीय कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेसंबंधी तत्काळ करण्याच्या उपाययोजनांविषयी यामध्ये चर्चा झाली. केंद्रीय आरोग्य मंत्रालयानं 'Suggestions to NTF' नावाचं पोर्टल तयार केलं असून त्यावर सूचना मागवल्या आहेत.

**<u>भारत-रशिया बैठक</u>**

आपत्कालीन व्यवस्थापन क्षेत्रात सहकार्यासंबंधीची भारत आणि रशिया संयुक्त आयोगाची दुसरी बैठक काल रशियात मॉस्को इथं पार पडली. गृहराज्यमंत्री नित्यानंद राय भारतीय शिष्टमंडळाचं नेतृत्व करत आहेत. रशिया भेटीच्या पहिल्या दिवशी, 2025-26 या पुढील वर्षासाठी आपत्कालीन व्यवस्थापन क्षेत्रातल्या सहकार्यावर संयुक्त आयोगाच्या कार्य आराखडा तयार करण्यात आला. या आराखड्यावर रशियाचे नागरी संरक्षण, आणीबाणी आणि नैसर्गिक आपत्तीच्या परिणाम निर्मूलन खात्याचे मंत्री कुरन्कोव्ह अलेक्झांडर व्याचेस्लाव्होविच आणि भारताचे गृहराज्यमंत्री नित्यानंद राय यांच्या स्वाक्षऱ्या झाल्या.

**<u>भंगार गाड्या</u>**

जुन्या प्रदुषणकारी व्यवसायिक तसंच प्रवासी गाड्या भंगारात काढून त्याजागी नव्या कमी प्रदुषणकारी गाड्या घेण्यासाठी प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने काल दिल्लीत महत्त्वाची बैठक पार पडली. भारत मंडपम् इथं काल झालेल्या बैठकीत रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नीतिन गडकरी यांनी भारतीय स्वयंचलित वाहन निर्माता सोसायटीच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या शिष्टमंडळाशी संवाद साधला. यावेळी रस्ते वाहतूक आणि महामार्ग राज्यमंत्री हर्ष मल्होत्रा आणि अजय टमटा उपस्थित होते. देशभरातून भंगार गाड्या टप्प्याटप्प्यानं बाद करण्यासाठी नवी प्रणाली राबवण्याच्या हेतूनं स्वयंसेवी पद्धतीने वाहनाचे आधुनिकीकरण कार्यक्रम किंवा वाहन भंगारात काढण्याचे नवे धोरण राबवण्याचा निर्णय घेतला आहे. हे नवे धोरण नोंदणीकृत वाहन मोडीत काढण्याची सुविधा आणि स्वयंचलित चाचणी केंद्र यांच्या माध्यमातून राबवले जाईल.

**<u>वायुदल कॉमिक</u>**

वायुदलाचे प्रमुख एअर चीफ मार्शल व्हीआर चौधरी यांनी काल भारतीय वायु दलातल्या नायकांवरील पहिले कॉमिक प्रकारातल्या पुस्तकाचे अनावरण केलं. भारतीय वायु दलाच्या स्थापनेपासूनच्या ऐतिहासिक आणि शौर्यगाथा सादर करण्याचा उद्देश यामागे आहेच. शिवाय, वाचकांना भारतीय वायु दलाचा इतिहासाविषयी शिक्षित करणं तसंच तरुणांमध्ये कर्तव्याची भावना आणि प्रेरणा वृद्धी करणे हा देखील उद्देश यामागे आहे. या पुस्तकात दोन कथा असून पहिली मार्शल ऑफ एअरफोर्स अर्जन सिंग यांच्याविषयी तर दुसरी कथा 1971 ऐतिहासिक बोयराच्या युद्धाविषयी आहे. हे कॉमिक भारतीय वायुदलात कारकीर्द करण्यासाठीची पात्रता, निवड निकष यांच्याविषयी माहिती देणार आहे. लहान मुलांसाठी हे पुस्तक मोफत उपलब्ध असेल. येत्या 8 ऑक्टोबरला वायुसेना दिनानिमित्त पुस्तकाची डिजीटल आवृत्ती प्रकाशित होणार आहे.

**<u>राष्ट्रपती आवाहन</u>**

कोलकाता इथं कार्यरत महिला डॉक्टरच्या नृशंस बलात्कार आणि खून प्रकरणानं संपूर्ण देशाला धक्का बसला असून, अशा प्रकारच्या घटनांविरोधात देशवासियांनी एकमुखाने आता पुरे म्हणले पाहिजे, असं आवाहन राष्ट्रपती द्रौपदी मूर्मू यांनी केलं आहे. गेल्या काही काळात महिलांविरोधात घडत असलेल्या गुन्ह्याच्या घटना पाहता प्रामाणिक आत्मनिरीक्षण करण्याची गरज असून त्यामुळेच अशा गुन्ह्याच्या मुळाशी जाता येऊ शकते. राष्ट्रपतींनी आपल्या समाज माध्यमांवरून हा संदेश दिला आहे. या घटनेविषयी कळल्यानंतर भीती आणि निराशा दाटल्याचं नमूद करत राष्ट्रपतींनी ही एकच घटना नसून महिलांविरोधी गुन्ह्यांच्या साखळीचा हा एक भाग असणे ही बाब निराशाजनक असल्याचं नमूद केलं. कोलकातामध्ये या नघटनेविरुद्ध विद्यार्थी, नागरिक आणि डॉक्टर्स विरोध प्रदर्शन करत असताना आरोपी मात्र मोकाट फिरत असल्याची बाब नक्कीच संतापजनक आहे.

**<u>पॅरीस दिव्यांग</u>**

पॅरिस इथं काल दिव्यांगांसाठीच्या पॅराऑलिम्पिक्स क्रीडा महोत्सवाचे भव्य उद्घाटन करण्यात आलं. फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांच्या हस्ते उद्घाटन झालेल्या या सोहळ्यात, 167 देशांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या 4 हजार 400 दिव्यांग खेळाडूंनी सहभाग घेतला. भारतीय क्रीडा चमूचं नेतृत्व भालाफेक खेळाडू सुमित अंतिल आणि विश्वविक्रमी टेबल टेनिस खेळाडू भाग्यश्री जाधव यांनी केलं. पॅराऑलिम्पिकच्या या स्पर्धेत 84 भारतीय दिव्यांग खेळाडूंनी सहभाग नोंदवला आहे. भारताच्या दिव्यांग क्रीडा इतिहासातलं हा सर्वात मोठा चमू स्पर्धेत 12 खेळांमध्ये भारताचं नेतृत्व करणार आहे. बॅडमिंटनमध्ये पुरुषांच्या एकेरीचे विजेतेपद राखण्यासाठी कृष्णा नागर प्रयत्नशील असेल तर अवनी लेखरा, मनीष नरवाल नेमबाजीचं लक्ष्य ठेवणार आहेत. या व्यतिरिक्त भारतीय दिव्यांग खेळाडू तिरंदाजी, सायकलिंग, तायक्वोंदो, जलतरण आणि टेबलटेनिस या प्रकारांमध्येही सहभागी होणार आहेत. आजपासून अॅथलेटिक्स क्रीडा प्रकाराला सुरूवात होणार असून त्यामध्ये 38 दिव्यांग खेळाडूंनी सहभाग घेतला आहे. पॅरिस पॅरालिम्पिकची सांगता 9 सप्टेंबरला होणार आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.

# नमस्कार.